ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास

**प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

★★★

**प्रस्तावना** – आज जगात कोविड–19 मुळे सर्व जगभर हाहाकार माजलेला असुन मष्त्युचे तांडव सुरू आहे. याला भारत देश देखिल अपवाद नाही. भारतामध्ये कोरोनाची दुसरी लाट आलेली असुन ही लाट ग्रामीण भागात शिरल्याने मृत्युचे प्रमाण वाढलेले आहे. याचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील लोक कोरोनाला घाबरतात व दुसरे म्हणजे अंगावर दुखणे काढतात. यामुळे कोरोना स्कोर वाढतो आणि पेशंट डॉक्टरांच्या हाताबाहेर जातो. याकारणाने येथील मृत्युदर अधिक आहे. पहिल्या लाटेत ज्याप्रमाणे कोरोनामुळे संपुर्ण जगभर लॉकडाऊन करण्यात आले. अगदी त्याचप्रमाणे भारतात दुसऱ्या लाटेमध्ये काही राज्यामध्ये लॉकडाऊन करण्यात आले. याचा फटका सर्वच क्षेत्राला बसलेला आहे. आज लॉकडाऊनमुळे जगातील सर्वच अर्थव्यवस्था डबघाईला आल्या आहे. मात्र भारतीय अर्थव्यवस्थेला मागील वर्षी व या वर्षी देखिल कृशी क्षेत्राने सावरले. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था कृशी प्रधान असुन ती यापुढे देखिल राहिल हे कोविड–19 मुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. लॉकडाऊनच्या काळात उद्योग क्षेत्र, सेवाक्षेत्र पुर्णपणे बंद असतांना भारतीय अर्थव्यवस्थेला तारणारे एकमेव क्षेत्र म्हणजे फक्त कृशीक्षेत्र होते. कोविड–19 मुळे भारतासह जगभरातील उद्योगक्षेत्र, व्यापारक्षेत्र ठप्प झाले होते. मात्र कृशीक्षेत्रामध्ये षेतमालाची कापणी,काढणी, मळणी असे विविध कामे चालुच होती. एवढेच नव्हे तर पुढील पिकांसाठी शेतीची मशागत देखिल करण्यात आली. कोविड–19 षी कोरोना योध्दे म्हणुन डॉक्टर जसे लढत आहे अगदी तसेच शेतकरी देखिल त्यांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावुन लढत आहे. संपुर्ण देश कोरोनामुळे बंद असतांना देखिल शहरातील लोकांना त्यांच्या घरापर्यंत अन्नधान्य, भाजीपाला शेतकऱ्यांनी पुरविला आहे. देशामध्ये अन्नधान्याची टंचाई भासु दिली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे मागील तीन दशकामध्ये शेतीक्षेत्रामध्ये जी प्रगती झाली त्याचा हा परिणाम आहे. देशभर लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध झाले असले तरी हे ही तेवढेच सत्य आहे की, अन्नधान्य उत्पादनात ज्याप्रमाणात वाढ झाली त्याप्रमाणात शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये मात्र वाढ झाली नाही. हे सत्य नाकरता येणार नाही. कोविड–19 चा परिणाम कोणत्याही एकाच क्षेत्रावर झालेला नाही तर कृशी, उद्योग व सेवा क्षेत्र यांच्यावर भौगोलिक, सामाजिक, आर्थिक स्वरूपात संपुर्ण क्षेत्रावर आणि पुर्ण जगावर याचा वाईट परिणाम झाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था देखिल याला अपवाद नाही. आज भारतीय अर्थव्यवस्था देखिल एका कठीण परिस्थितीतुन जात आहे. देशात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांवर याचा वाईट परिणाम झालेला आहे. कृशीक्षेत्र, उद्योगक्षेत्र आणि सेवाक्षेत्र हे तीनही क्षेत्र मंदीकडे वाटचाल करतांना दिसुन येत आहे. सदय स्थितीमध्ये जागाच्या तुलनेत भारताची स्थिती भयावह झाली आहे. कारण भारताकडे आजही आवश्यक तेवढी आरोग्य सुविधा उपलब्ध नाही. डॉक्टर, नर्स, खाटा यांची संख्या कमी आहे, लोकांना ऑक्सीजनचा पुरवठा वेळेवर होत नाही, दवाखान्यात बेड उपलब्ध नाही, व्हेंटिलेटर अपुरे आहेत. इंजिशेनचा तुटवडा आहे. एकुनच भारतीय आरोग्य यंत्रनेवर अधिक ताण आलेला आहे. या एक नव्हे अषा अनेक समस्या भारतापुढे आज निर्माण झाल्या आहेत. यामुळे भारतामध्ये मष्त्युदर वाढला आहे. आपल्याकडे आजही ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचे पाणी, पौश्टिक आहार, चांगली आरोग्य सेवा यासारख्या सुविधांचा अभाव आहे. पहिल्या लॉकडाऊनच्या काळात षहरामधील अनेक कंपन्या बंद झाल्याने शहरातील अनेक कामगारांनी खेडयाकडे धाव घेतली यामुळे शेतीक्षेत्रावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. याचा परिणाम उत्पादकतेवर होऊ शकतो असे भाकित केले होते मात्र सुदैवाने तसे झाले नाही. पहिली लाट ओसरली आणि ग्रामीण भागात आलेला मजुर पुन्हा शहराकडे आला. परप्रांतीय मजुर रोजगारासाठी पुन्हा महाराष्ट्रात आला कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे, शाळा महाविद्यालये सुरळीत सुरु झाली. मात्र कोरोनाचे निर्बंध न पाळले गेल्याने काही काळातच परिस्थिती पुर्व पदावर येत काही नाही तेवढयात कोरोनाची दुसरी लाट आली आणि पुन्हा राज्यांना लॉकडाऊन करावा लागला. तर देशात दुसरीकडे पाच राज्याच्या निवडणुका आणि येथील प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये जणु काही कोरोना संपला अशा अर्विभावात राजकिय नेत्यांनी सभा घेतल्या व जे व्हायला नको होते तेच झाले. येथे कोरोना उद्रेक झाला व आज भारतामध्ये दररोज चार लाखाच्या वर कोरोनाची लागण झालेले लोक सापडत आहे. याला जबाबदार कोन असा प्रश्न निर्माण होतो?

**उद्दिष्टे** : – प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. कोविड – 19 चे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
2. कोविड – 19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या अनुकुल परिणामाचे अध्ययन करणे.
3. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या प्रतिकुल परिणामाचे अध्ययन करणे.

**गृहितके :** प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे काही गृहिते मांडण्यात आली आहेत.

1. कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर परिणाम झाला आहे.
2. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकुल परिणाम झाले आहे.
3. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर काही प्रतिकुल परिणाम झाले आहे.

**संशोधन व्याप्ती :** प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती खुप मोठी असुन कोविड–19 चा प्रभाव संपुर्ण जगावर झालेला असुन यामुळे मोठी जागतीक महामारी आलेली असुन जागतीक महामंदी सदय परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोनामुळे षेती, उद्योग, सेवा या सर्वच क्षेत्रावर वाईट परिणाम झालेला आहे. प्रस्तुत संशोधनात एकुन भारतीय अर्थव्यवस्थेवर व विविध क्षेत्रावर झालेल्या अनुकुल व प्रतिकुल परिणामांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संषोधनासाठी पुर्णपणे व्दितिय साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असुन यासाठी विविध दैनिक पेपरर्स, विविध वेबसाईट, विविध संदर्भ ग्रंथ याचा आधार घेऊन माहिती संकलित करण्यात आली आहे.

**विषय विस्तार :** कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर दुरगामी असा काही चांगला तर वाईट परिणाम झाालेला दिसुन येतो. या परिणामाची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे पाहता येते.

**कृशी क्षेत्रावरील परिणाम :** भारतीय शेती व्यवसाय हा निसर्गाशी खेळला जाणारा जुगार समजला जातो. यातच आपल्या शेतकऱ्याच्या वाटयाला आठराविश्व दारिद्रय आहे. यामुळे त्यांना नेहमीच वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागत असते. कधी आस्मानी संकटे तर कधी इतर संकटे असतातच. विशेषतः भारतीय शेतकऱ्यासमोर नेहमी तीन महत्वाच्या समस्या राहिल्या आहेत. त्यात पहिली समस्या म्हणजे भारतीय शेतकरी मोठया प्रमाणात कर्जबाजारी आहे. दुसरी समस्या उत्पादन खर्चात सतत वाढ होते आहे. तिसरी आणि सर्वात महत्वाची समस्या म्हणजे उत्पादन खर्चापेक्षा अधिक किंमत शेतमालाला मिळत नाही. आज या तीनही समस्या सोडविण्याची गरज आहे. तरच कृशी व शेतकरी वाचेल. कोविड–19 मुळे संपुर्ण देशात लॉकडाऊन केल्यामुळे ग्रामीण भागातुन शहरी भागात विविध वस्तुचा पुरवठा करणारी साखळी तुटली आहे. ही साखळी पुर्ववत करण्याची गरज आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये कृशी उत्पादित शेतमाल उपभोक्त्यापर्यंत पोहचविण्यासाठी सरकारी प्रयत्न होणे आवष्यक आहे. आज ग्रामीण भागातुन जो भाजीपाला येत आहे त्याला कवडीमोल भाव मिळत आहे. यामुळे शेतकरी हताश झाला आहे.

कोविड–19 च्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला सावरणारे एकमेव क्षेत्र कष्शी क्षेत्र आहे. असे असले तरी या क्षेत्राची उत्पादकता खुप आहे असे नाही. मागील वर्शी मार्च महिण्यात लॉकडाऊन सुरु झाला त्यावेळी षेतमाल काढणीची वेळ होती. जेमतेम षेतमाल काढला मात्र बाजारपेठेअभावी त्याला चांगला भाव मिळु षकला नाही. यावर्शी यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही उलट जास्त विदारक परिस्थिती आहे. कारण अवेळी पाऊस, हवामानात बदल, मुख्यबाजारपेठा बंद यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. यातच आताची कोरोना साथ ही ग्रामीण भागात जोरात पसरल्याने शेतकरी पुरा हैरान झालेला आहे. दवाखान्यामध्ये लाखो रुपये लागले आहे. आता बी बियाने, खते कशी विकत घ्यायाची याची शेतकऱ्याला भ्रांत आहे. लोकांना शेतमालाचे उत्पादन दिसत असले तरी त्याला किंमत कवडीमोल मिळाल्याने शेतकरी आर्थिक विंवचनेत आहेत. किराणा माल किंवा इतर वस्तुच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यात खते, बियाने, खाद्यतेल, कपडे, सिमेंट आदी वस्तुच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. मात्र दुसरीकडे सोयाबिन वगळता इतर शेतमालाला कवडीमोल भाव आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न आ वासुन उभे आहेत. मागील काही वर्षामध्ये भारतीय कृशीक्षेत्राच्या विकास दरामध्ये ऐतिहासिक घटीची नोंद झाली आहे. हे कृशी व संबंधित क्षेत्राचा विकासदर पुढील तक्त्यावरुन लक्षात येइल.

| अ.क्र. | वर्ष | कृषी व संबंधित क्षेत्राचा विकास दर |
|---|---|---|
| 1 | 2012.13 | 1.5 |
| 2 | 2013.14 | 5.6 |
| 3 | 2014.15 | 0.2 |
| 4 | 2015.16 | 0.6 |
| 5 | 2016.17 | 6.3 |
| 6 | 2017.18 | 5.0 |
| 7 | 2018.19 | 2.9 |
| 8 | 2019.21 अंदाजे | 2.8 |

वरील आकडेवारीवरुन लक्षात येते की, कृशी व संबंधित क्षेत्राच्या विकासदरामध्ये मोठी घसरण झालेली आहे. ही घट असीच सुरू राहीली तर कृशी विकासदर पुन्हा नकारात्मक होऊ शकतो. सरकारने कृशी विकासाठी अनेक घोषणा केल्या असल्या तरी त्या अतिशय तटपुंज्या आहेत. लॉकडाऊनमुळे कृशी बाजार भरत नाही. यामुळे मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन बिघडू शकते. आज ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था असी विभागणी राजकारणी लोक करतांना दिसुन येतात मात्र सदय स्थितीला ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था अशी विभागणी होऊ शकत नाही. कारण आज अशा काही बाबी आहेत की, शहरामधील लोक ग्रामीण भागावर आवलंबुन आहे. याउलट ग्रामीण भागातील लोक हे शहरीभागावर आवलंबुन आहेत. याचाच अर्थ ग्रामीणभाग व शहरीभाग परास्परावंबी

Research student &

आहेत. त्यांना वेगवेगळे करता येणार नाही. संयुक्त राष्ट्राच्या 2019 च्या अहवालात असे म्हटले आहे की, भारतातील 69 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. याचा दुसरा अर्थ असा होतो की, 69 टक्के मागणी ही ग्रामीण भागातुनच येते. मात्र याकडे आपले दुर्लक्ष होतांना दिसुन येते.

**उद्योग क्षेत्रावरिल परिणाम** : ज्या अर्थव्यवस्थेला उदोयन्मुख अर्थव्यवस्था म्हणुन संबोधले जायचे त्या अर्थव्यवस्थेतील कोविड–19 या विशाणुच्या भितीपोटी सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे असे सर्वच उद्योग, कंपन्या, कारखाने बंद करण्यात आले. औद्योगिकीकरणाला विकासाचे इंजिन म्हणतात. मात्र या विशाणुच्या प्रार्दुभावामुळे नविन उद्योग तर सोडाच अस्तित्वात असलेले उद्योग देखिल बंद करावे लागले. यामुळे अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. देशातील अनेक लोक बेरोजगार झाले आहेत. यात परप्रांतीय आपल्या गावी जाण्यासाठी वाहन नसल्याने पायी गेले तर कित्येकांनी आपला जीव गमवला लागला. अशी विदारक स्थिती कोरोनामुळे निर्माण झाली होती. मधल्या काळात शासनाच्या कठोर उपाय योजनामुळे व लोकांच्या सहकार्यामुळे कोरोना थोडा कमी झाला होता. त्यामुळे देशातील अनेक उद्योग, कंपन्या, कारखाने सुरु झाले. मात्र पुन्हा दुसऱ्या लाटेच्या माध्यमातुन कोरोनाने डोके वर काढले. आणि पुन्हा सर्व कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे बंद करावे लागले. म्हणजेच अर्थव्यवस्था पहिल्या लाटेपासुन सावरत नाही तोपर्यंत दुसरी लाट आली आणि पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली. यामुळे अर्थव्यवस्था डबघाईला तर आलीच शिवाय यामुळे अनेक लोकांना बेरोजगार व्हावे लागले. हातावर पोट असणाऱ्या मजुराची अवस्था तर खुपच वाईट आहे.

**सेवा क्षेत्रावरिल परिणाम** : ज्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा आणि उद्योग क्षेत्राचा वाटा अधिक असतो ती अर्थव्यवस्था विकसीत असते असा एक संकेत आहे. भारतामध्ये देखिल हळुहळु अशी स्थिती होतांना दिसु लागली होती. जीडीपी मध्ये कष्शी क्षेत्राचा वाटा कमी होऊन सेवा क्षेत्राचा वाटा वाढु लागला होता. आंतरराष्ट्रीय आयात निर्यात वाढली होती. परकिय निर्यात वाढली होती. यानिर्यातीमध्ये सर्वाधिक वाटा सेवा क्षेत्राचा होता. जहाज सेवा, हवाई वाहतुक, डॉक्टर, वकिल, इंजिनियर, विविध यंत्राचे सुटे भाग,मसाल्याचे पदार्थ, सुती कापड अशा एक दोन नव्हे तर हाजोरो वस्तु व सेवांची निर्यात आपण करत होतो आणि परकिय चलन मिळवित होतो. मात्र या कोविड–19 च्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झाला. यामुळे देशाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. म्हणजेच कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. लॉकडाउनमुळे सर्व व्यवहार ठप्प झाल्याने देशासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. यातुन अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नर मा. शक्तीकांत दास यांनी मागे दुसरे तिमाही धोरण जाहिर केले त्यामध्ये त्यांनी भारतासमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक संकटाची सविस्तर मांडणी केली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा विकासदर पहिल्या सहामाहित उणे राहणार आहे असे सांगितले. यातुन बाहेर पडण्यासाठी उद्योजकांच्या कर्जाची फेररचना, सोन्यावर 90 टक्क्यापर्यंत कर्ज, गृहनिर्माण क्षेत्रात पाच हजार कोटी रू.चा अर्थपुरवठा आणि शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करण्यासाठी नाबार्डकडे आणखीन पाच हजार कोटी रू. ची केलेली तरतुद इत्यादी उपाय योजना करण्यात आल्या. याशिवाय देशाच्या आरोग्य यंत्रणेची स्थिती बघुन तिसऱ्या तिमाही धोरणाची वाट न बघता गर्व्हनरने नुकतेच बॅंकासाठी

तरलतेसाठी मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. मात्र हा निधी म्हणजे कर्ज फक्त आरोग्य सुविधा निर्माण करणाऱ्या उद्योजकांना मिळणार आहे. यामुळे आरोग्य सुविधा निर्माण करण्याला मदत होईल. व देशातील मृत्युदर कमी होईल.

आज कोविड–19 मुळे देशातील सर्वच क्षेत्र प्रभावित झाले आहे. यात शाळा महाविद्यालयाचा देखिल समावेश आहे. मागील वर्षापासुन सर्व शाळा महाविद्यालये बंद असुन पहिली ते नववी मधील सर्व विद्यार्थ्यांना परिक्षाविना पुढच्या वर्गात बढती देण्यात आली होती. मागील वर्षी दहावी आणि बारावीच्या परिक्षा झाल्या होत्या मात्र या वर्षी त्या देखिल घेता आल्या नाहित. उच्च शिक्षणामध्ये ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेतल्या जात आहे मात्र येथे देखिल अनेक विद्यापीठाचा घोळ झालेला आहे. परिक्षेसाठी आवश्यक साधनाचा आणि प्रशिक्षित मणुष्य बळाचा अभाव असल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

कोविड–19 चा प्रार्दुभाव असला तरी कोविडच्या या संकटामुळे प्रभावित झालेले विविध क्षेत्र पुर्ववत कसे सुरू करता येईल यावर आज सर्वत्र मोठया प्रमाणात चर्चा चालु आहे. मात्र यामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अधिक चर्चा होतांना दिसुन येत नाही. कृशीक्षेत्र हे एकमेव क्षेत्र असे आहे की, वर्तमानात आणि भविष्यात देखिल भारतीय अर्थव्यवस्थेला तारुण नेऊ शकते, भारतीय अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी देऊ शकते. त्यामुळे याकडे अधिक लक्ष देण्याची गरज वाटते.

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील ज्वलंत आणि महत्वाचा प्रश्न म्हणजे बेरोजगारीचा होय. देशभरातील लॉकडाऊनमुळे असंघटित व खाजगी क्षेत्रातील सर्व लोकांचे रोजगार बुडाला आहे. देशासमोर बेरोजगारीचा भयानक प्रश्न उभा ठाकला आहे. बेरोजगारीवर सरकारने दोन महिने रेशन मोफत देण्याची घोषणा केली आहे. मात्र देशातील अनेक लोकांकडे रेशनकार्ड नाही. शिवाय कंपनीमध्ये चांगल्या पदावर असल्याने त्याला रेशन मिळत नाही. रोजगार चालु असतांना हे ठिक होते मात्र आज नोकरी नाही आणि रेशनही नाही असे अनेक बेरोजगार लोक आहेत. याव्यतिरिक्त अनेक भटके लोक आहेत की ज्यांच्याकडके रेशन कार्डच नाही अशा लोकांचे काय? यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याला पर्याय रोजगार हमी योजना आहे. मात्र सर्वचजन येथे काम करु शकत नाही त्याला काही मर्यादा आहेत. एकुनच संघटीत क्षेत्रातील बेरोजगारापेक्षा असंघटित लोकांच्या रोजगाराचा प्रश्न विदारक आहे.

भारतामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारे लोक अधिक आहे. तसेच एका राज्यामधुन दुसऱ्या राज्यात काम करायला जाणाऱ्याची संख्या देखिल माठी आहे. लॉकडाऊन सुरू झाल्यावर याच लोकांचे हाल सर्वात जास्त झाले आहे. उद्योग, व्यवसाय, कंपन्या सर्वच बंद झाल्याने या मजुंरांनी आपला मोर्चा आपल्या गावाकडे वळवला मात्र वाहतुक व्यवस्था बंद असल्याने मिळेल त्या मार्गाने, पायी लोक आपापल्या गावी गेले. यामध्ये अनेक मजुरांना आपला जीव गमवावा लागला. थोडक्यात भारतामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याचे प्रमाण आजही मोठे आहे. एका आकडेवारीनुसार भारतामध्ये असंघटित क्षेत्रात सर्वाधिक कामगार संख्या असणारी पाच राज्य खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | राज्य क्षेत्रातील | संघटित कामगारांच्या संख्येशी टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | राजस्थान | 54.08 |
| 2 | पंजाब | 51.0 |
| 3 | आंध्रप्रदेश | 51.08 |
| 4 | छत्तीसगड | 49.0 |
| 5 | गुजरात | 48.4 |

भारतामध्ये वरील पाच राज्यामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे हे वरिल आकडेवारीवरून सहज समजते. भारतातील शहरी भागात नियमित रोजगार किंवा पगार मिळवणारे (बिगर कृशी क्षेत्रातील) 37 टक्के लोक हे असंधटित क्षेत्रात मोडतात. आणि शहरी भागातील लॉकडाऊनमुळे त्याचे देखिल नियमित मिळणारे उत्पन्न बंद झाले आहे. यामुळे यांचे देखिल हालच झाले आहेत. भारतामध्ये भविष्यात कोविड–19 सारखी परिस्थती निर्माण होऊ नये किंवा जरी अशी परिस्थिती निर्माण झालीच तर त्यावर उपाय आपणाला आत्ताच शोधले पाहिजे. आपल्या देशात औद्योगिकीकरणाचे केंद्रीकरण झालेले आहे विषेशतः शहरी भागात पायाभुत सोयी सुविधा अधिक असल्याने शहरी भागातच उद्योग स्थापन होतात. मात्र त्याचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. यापुढे ग्रामीण भागावर अधिक लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागात पायाभुत सोयी सोविधा निर्माण करून नविन उद्योग ग्रामिण भागात उभारण्याला प्राधान्य दिले पाहिजे. विषेशतः कृशी क्षेत्रावर आधारित उद्योगधंदे किंवा कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, कंपन्या ग्रामीण भागात स्थापन कराव्यात. यामुळे अनेक फायदे होईल. कच्चामाल सहज उपलब्ध होईल, वाहतुक खर्चात कपात होईल, स्वस्तामध्ये मजुर उपलब्ध होतील आणि सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्रामीण भागातुन शहरी भागाकडे रोजगाराच्या शोधासाठी येणारा लोकांचा लोंढा थांबवता येईल. पर्यायाने शहरी भागात लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी होतील.

**अनुकुल परिणाम :** कोविड–19 च्या प्रभावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला असुन त्याला भारतीय अर्थव्यवस्था अपवाद नाही. उलट भारतासारख्या विकसनशिल अर्थव्यवस्था अधिकच खिळखिळया झालेल्या आहेत. असे असले तरी या कोरोनाच्या महामारीतुन अनेक देशांना एका अर्थाने शिकवणच मिळाली असुन यामध्ये काही गोष्टी चांगल्या घडल्या आहेत त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. परकिय देशावर आवलंबुन राहण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
2. देश स्वंयपुर्ण असणे किती गरजेचे आहे याची कल्पना आली.
3. वैद्यकिय सुविधेमध्ये वाढ करण्यात आली.
4. स्वदेशी उद्योगाला चालना मिळाली.
5. प्रदुषण कमी होण्याला मदत झाली.
6. जागतिक स्तरावर आपला देश कोठे आहे याची कल्पना आली.
7. सर्वांना स्वंयशिस्त लागली.
8. आरोग्य विषयी व स्वच्छेतेविषयी जाणीव जागृती झाली.
9. अनेकांना नवनविन तंत्रज्ञान व उपकरणे हाताळण्या विषयीचे ज्ञान अवगत झाले.
10. अनावश्यक खर्च कमी झाला.

**प्रतिकुल परिणाम :** कोविड–19 च्या प्रभावामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकुल परिणामापेक्षा प्रतिकुल परिणाम अधिक झालेले आहे. ते परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. अनेक लोकांचे रोजगार जावुन बेरोजगारीत मोठी वाढ झाली.
2. लॉकडाऊनमुळे राज्याच्या सीमा बंद असल्याने जीवनावश्यक वस्तुची टंचाई निर्माण होऊन भाववाढ झाली.
3. आपण वैद्यकिय सुविधमेध्ये किती मागे आहोत याची जाणीव झाली.
4. वैद्यकिय सुविधे अभावी अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला.
5. देशातील सर्वच विद्यार्थ्यांचे न भरुन निघणारे शैक्षणिक नुसान झाले.
6. शेतीमालाला कवडीमोल दर मिळाला.
7. कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे बंद पडल्याने विकासदर खुंटला.
8. लॉकडाऊनमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झाल्याने परकिय गंगाजळी येणे थांबले.
9. हॉस्पीटल बॅकिंग सेवा वगळता सर्व सेवा क्षेत्र जवळपास बंद आहे.
10. डॉक्टर, पोलिस व स्वच्छता कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त ताण आला.

11. अनेकांचे संसार मोडले.
12. हातावर पोट असणाऱ्या लोकांचे हाल झाले.
13. परराज्यातुन आलेल्या मजुराचे देखिल हाल झाले असुन गावी जातांना अनेक मजुराचा जीव गेला.

**शिफारशी :** कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्र प्रभावित झाले असुन या जागतिक महामारीतुन देशाला व देशातील जनतेला सुरक्षित रित्या बाहेर काढणे आवश्यक आहे. भारताने कोरोनाच्या पहिल्या लाटेला सावधनतेने व प्रभाविपणे हातळल्याने पहिली लाट लवकर ओसरली मात्र कोरोना संपला या अर्विभावाने लोक कोणत्याही प्रतिबंधात्मक उपाय योजना न करता वावरु लागले. सर्व व्यवहार देखिल सुरु झाले. मात्र लोकांचा गैरसमज, लग्नसमारंभ, धार्मिक विधी आणि राजकिय सभा यामुळे होणाऱ्या लोकांची गर्दी वाढली यातुन कोरोनाने पुन्हा डोके वर काढले व देषात दुसरी लाट पहिल्यापेक्षा जोमाने आली. कोरोना ग्रामहण भागात शिरल्याने त्याला अटोक्यात आणणे कठीण झाले. या लाटेत मृत्युदराचे प्रमाण अधिक आहे. ऑक्सिजनच्या व बेडच्या अभावी लोक मरत आहे. ही बाब आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्षात आल्याने आपणाला अनेक देशाकडुन ऑक्सिजन, व्हेंटिलेटर अशा सुविधा पुरविल्या जात आहे. आरोग्या सारख्या सुविधासाठी आपणाला दुसऱ्या देशाकडे हात पसरावे लागतात यासारखी दुसरी लाजीरवाणी गोष्ट नाही. येथे ज्या देशांनी आपणाला वैद्यकिय सोयी सुविधा पुरविल्या त्या देशाचे खरोखरच आभार मानावे तेवढे कमीच होतील.

1. लवकरात लवकर देशातील सर्व लोकांचे लसीकरण करावे.
2. दोन व्यक्तीमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे.
3. हात नेहमी साबनाने स्वछ धुवावे.
4. सॅनिटायझरचा वापर करावा.
5. लग्न समारंभ दहा व्यक्तीमध्येच पुर्ण करावा.
6. राजकिय सभा घेण्यावर बंदी असावी.
7. धार्मिक सण उत्सव कोरोना नियमाचे पालन करुनच पार पाडावे.
8. गर्दी करणे व गर्दीत जाणे टाळावे.
9. अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडु नये.
10. घराबाहेर पडल्यास मास्कचा वापर करावा.
11. बाहेरुन आल्यावर हात पाय स्वछ धुतल्या शिवाय घरात येवु नये.
12. संतुलित आहार घ्यावा.
13. दररोज व्यायाम, योगा करावा.
14. अंगावरिल कपडे, रुमाल, मास्क दररोज धुवावेत

**सारांश :– अ**सारांश रुपाने असे म्हणता येईल की, लॉकडाऊनमुळे कृशी क्षेत्राबरोबरच उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्र यांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. असे असले तरी ही परिस्थिती अशीच राहणार नसुन कोरोनावर आपण लावकरच मात करणार आहोत. तेव्हा निराश किंवा हाताश न होता कोरोना प्रतिबंधात्मक नियमाचे पालन करुन आधी कोरोनाला हरवु. आणि नंतर नव्या जोमाने कामाला सुरुवात करु यात शंका नाही. सध्या शेतीचा हंगाम संपला असुन नविन हंगामाची सुरुवात होत आहे. तेव्हा कृशीसाठी लागणारी सर्व आदाने शेतकऱ्याला उपलब्ध करुन द्यावी. उद्योगक्षेत्र देखिल टप्याटप्याने पन्नास टक्के उपस्थितीमध्ये सुरु करावे. सेवा क्षेत्रामध्ये जेवढे घरुन काम करता येईल तेवढ करावे. व अर्थव्यवस्थतेला चालु ठेवावे लागेल. आवश्यकता भासेल त्यांना कमी व्याजदराने या तीनही क्षेत्राला स्वस्त कर्ज पुरवठा करावा. हाताश न होता, घाबरुन न जाता, मनात येणाऱ्या निराशेला पळवुन लावुन येणाऱ्या परिस्थिला आपणाला सामोरे जावे लागणार आहे. तेव्हा लॉकडाऊन हे संकट नसुन आलेली संधी आहे असे समजुन या संधीचे सोने करण्याची ही वेळ आहे. शेवटी एकच सांगेल आपण सर्व कोरोनाची लस घेऊन, कोरोना नियमाचे पालन करुन कोरोनाला पळवुन लावु.

***संदर्भ –***

1. *www.loksatta.com*
2. *https://www.bbc.com/marathi/india-52097708*
3. *https://www.maxmaharashtra.com/max-reports/potential-impact-ofcovid-19-on-the-indian-economy-food-andagriculture/82261/*
4. *https://www.maxmaharashtra.com/max-reports/kpmg-report-potential-impact-of-covid-19-on-the-indian-economy-1/82248/*
5. *https://www.orfonline.org/marathi/covid-19-could-be modis-reform-moment-68118/*